देव देव करता काय ?

देवाने आपले साधते काय ?

हातातले बळ, पायातले बळ

देव काढून घेतो काय ?

हाका मारून येत नाही !

जागा करून उठत नाही !

हा अनुभव घेऊन सुद्धा

पूजा तुमची थांबत नाही !

देव भले करतो काय ?

देव वाईट करतो काय ?

माणसासाठी वेळ नाही

देव नेमके करतो काय ?